॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 229242 | E-mail: approval@srtmun.ac.in
FAX No. (02462) 229574 | website: srtmun.ac.in

जावक क्र.शैक्ष/मान्यता/०२/२०२२–२३/1482 दिनांक : २७/०३/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य.
सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना सेवांतर्गत प्रगती योजना (CAS) अंतर्गत पदोन्नतीसाठी विद्यापीठाने दिलेल्या कॅस निवड समिती मार्फत कार्यवाही करणेबाबत...

संदर्भ : १) मा.कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ यांचे पत्र क्र.सभा व निवडणुक/व्य.प.कार्यवाही –७६/२०२१–२२/४२६, दि.०७/१०/२०२१
२) मा.व्यवस्थापन परिषद बैठक क्र.७६, दि.१५/०९/२०२१ व विस्तारीत बैठक दिनांक २४ व २५ सप्टेंबर, २०२१ मधील ठराव क्र.०२/७६–२०२१(B) च्या निर्णयाबाबत.
३) या विभागाचे परिपत्रक क्र.शैक्ष/मान्यता/०२/२१–२२/४५१४, दि.०४/१०/२०२१
४) या विभागाचे परिपत्रक क्र.शैक्ष/मान्यता/०२/२१–२२/४५५८, दि.०९/१०/२०२१
५) या विभागाचे परिपत्रक क्र.शैक्ष/मान्यता/०२/२१–२२/५२०१, दि.०८/०३/२०२२

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्रास अनुसरून, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, मा.व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावानुसार ज्या महाविद्यालयांनी सेवांतर्गत प्रगती योजने अंतर्गत निवड समितीची मागणी केली आहे व त्या महाविद्यालयास निवड समिती दिलेली आहे, परंतु संबंधित महाविद्यालयांनी स्थाननिश्चितीची कार्यवाही करून प्रस्ताव सादर केलेला नाही. त्या महाविद्यालयांनी तातडीने विद्यापीठात प्रस्ताव सादर करण्यात यावे असा ठराव पारित केलेला आहे.

या संदर्भात यापुर्वी संदर्भीय पत्र क्र.३ व ४ अन्वये सर्व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे. परंतु आपणास पुन:श्च कळविण्यात येते की, शासन आदेशानुसार CAS अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र शिक्षकांच्या CAS अंतर्गत स्थाननिश्चिती प्रक्रिया वेळेवर पूर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. विलंबाने कॅस अंतर्गत स्थाननिश्चिती झाल्यामुळे शिक्षकांचे आर्थिक नुकसान होते. हे नुकसान होणार नाही या करीता पात्रता पूर्ण करणाऱ्या शिक्षकाचे वेळेवर कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीची प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी प्राचार्याची आहे. याची दक्षता घ्यावी.

मगे पहा...२..

आपणास मा.प्र—कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, स्थाननिश्चिती निवड समितीवरील मा.कुलगुरू प्रतिनिधी किंवा विषय तज्ज्ञ उपस्थित राहण्यास असमर्थता दर्शविली असेल तर त्वरीत प्रतिनिधी बदलून घेण्यासाठी विद्यापीठाशी पत्रव्यवहार करून नवीन मा.कुलगुरू प्रतिनिधी किंवा विषय तज्ज्ञांची नांवे घ्यावीत. विद्यापीठ प्रशासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही स्थाननिश्चिती प्रकरणांत केवळ गणपुर्ती पुर्ण होत असल्याने एकाच मा.कुलगुरू प्रतिनिधी यांना बोलाविण्यात आले. स्थाननिश्चिती निवड समितीवरील दोनही मा.कुलगुरू प्रतिनिधींना बोलाविणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्थाननिश्चितीची कार्यवाही पुर्ण करू नये, कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

प्रत माहितीस्तव —

१) मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्र—कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.